**ORIGINAL ARTICLE**

# आर्थिक सुधारणा काळातील महाराष्ट्राच्या कृषी उत्पादन व उत्पादकतेतील बदल

**डॉ.एम.एन. बिरादार**
सहयोगी प्राध्यापक व मार्गदर्शक,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर,
जि. नांदेड

**रमेश मारोतीराव राठोड**
संशोधक विद्यार्थी,
अर्थशास्त्र विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेची कृषी अर्थव्यवस्था म्हणून सर्वत्र ओळख आहे. वर्ष २०११ नुसार महाराष्ट्रातील जवळपास ५४ टक्के लोकसंख्या ही शेती व शेती आधारित व्यवसाय करून आपली उपजीविका करतात. देशातील बहुसंख्य उद्योगक्षेत्र हे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. त्यामुळे उद्योग व सेवा क्षेत्राचा कितीही विकास झाला तरी कृषी क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व हे कमी होत नाही. डॉ.एम.एस स्वामीनाथनच्या मते, 'जर कृषी क्षेत्र बिघडले तर इतर कोणतेही क्षेत्र सुस्थितीत राहणार नाही.'

अशा या महत्त्वपूर्ण क्षेत्राचा स्वातंत्र्योत्तर काळात सरकारच्या प्रयत्नामुळे काही प्रमाणात विकास झाला असला तरी इतर क्षेत्राच्या तुलनेत (उद्योग व सेवा) तो खुपच कमी आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे स्वातंत्र्यानंतर येथील धोरणकर्त्यांनी पाश्चात्य देशाचे अनुकरण करत उद्योग व्यवसायाला प्राधान्य दिले व 'शेती' सारख्या प्रमुख क्षेत्राच्या नियोजनबद्ध विकासाकडे दुर्लक्ष झाले व त्यामुळे उद्योग व सेवा क्षेत्राची प्रगती झाली असली तरी, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृषीक्षेत्राची फारशी प्रगती झाली नाही. यासाठी सरकारला शेतीच्या विकासासाठी विविध व्यूहरचना व योजना राबवाव्या लागल्या. त्याचाच परिणाम म्हणून देशाचा कृषी विकास दर वाढविण्याच्या दृष्टीने राज्य व केंद्रीय स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत.

**महाराष्ट्रातील कृषी विकास :**

राज्याच्या शेतीचे स्वरूप पाहिले असता असे दिसून येते की शेती ही परंपरागत स्वरूपाची आहे. त्यात लहान व सिमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. शेती ही शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे व जीवनशैलीचे साधन आहे. इतर क्षेत्राच्या तुलनेत कृषीची स्पर्धाक्षमता कमी आहे. आर्थिक सुधारणा काळापूर्वी भारतीय कृषीच्या संदर्भात जी धोरणे नियोजन काळापासून चालू होती. त्यात बदल करणे आवश्यक झाले. कृषीतील स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी अनेक धोरणात्मक बदल व्यापार संघटनेच्या निर्देशानूसार करणे अनिवार्य झाले होते. एक महत्त्वाचा घटक म्हणजे शेती ही निसर्गावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. यामुळे राज्याच्या शेती क्षेत्रात मोठ्या प्रम्णणात अनिश्चितता आहे.

आर्थिक सुधारणा काळात राज्याच्या कृषी क्षेत्राची स्थिती सुधारण्यासाठी सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणून सुधारणा काळात राज्य सरकारने व केंद्र सरकारने कृषी विकासासाठी अल्पकालीन व दिर्घकालीन दृष्टीकोन विचारात घेऊन ज्या व्यूहरचना व धोरणे आखलेली आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय कृषी धोरण, शेतीसाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदी, जलसिंचनाचा विकास, विविध पंचवार्षिक योजनेतील उद्दिष्ट्ये व इतर योजनांचा समावेश होतो. वर्ष २०११ नुसार राज्याचा देशांतर्गत स्थूल उत्पन्नात १४.४ टक्के हिस्सा आहे. गेल्या काही वर्षापासून स्थूल राज्य उत्पन्न वेगाने वाढत आहे. राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्रांचा राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा सुमारे ८७.१ टक्के आहे. कृषि व संलग्न कार्य या क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा १२.९ टक्के आहे. राज्यातील २२६.१ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. व ५२.१ लाख हेक्टर जमीन वनाखाली असून सिंचनात वाढ व्हावी यासाठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सध्या एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या १८ टक्के सिंचित क्षेत्र असून बिगर सिंचन क्षेत्रात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम गतीने राबविण्यासाठी जलसंधारण अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. पशुसंवर्धन हे कृषि क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे क्षेत्र आहे. देशातील पशुधन व कुक्कुटपालन यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे ७ व १० टक्के आहे. राज्याच्या कृषीत एकूण लोकसंख्येच्या ५४.३ टक्के लोकसंख्या ही कृषीवर अवलंबून आहे. **म्हणून कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करणे म्हणजे राज्याच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्येला विकासापासून दूर ठेवल्या सारखे होईल म्हणून कृषीचा विकास करणे अगत्याचे आहे.**

**राज्याचे कृषी उत्पादन :**

कोरडवाहू शेतीतील अन्नधान्याची उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी अशी महाराष्ट्र राज्याची स्थिती आहे. लागवडीखालील निव्वळ क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्राचा भारतात दुसरा क्रमांक लागतो. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर इतके असून पिकाखालील क्षेत्र वर्ष २०११ नुसार ७५.०५ टक्के इतके आहे. तर सरासरी धारण क्षेत्र १.२८ टक्के इतके आहे. राज्य सरकारने कृषी क्षेत्रासाठी जी अनेक धोरणे व विविध योजना राबविलेल्या आहेत. यामुळे कृषी क्षेत्राकडे पाहण्याचा सामान्य शेतकऱ्यांचा दृष्टिकोण बदललेला आहे. यामुळे महाराष्ट्र राज्याच्या कृषी पिकाखालील संरचनेतही बदल घडून आलेला आहे. अन्नधान्याच्या पिकाखालील क्षेत्राच्या तुलनेत नगदी पिकांखालील क्षेत्रात वाढ घडून येत आहे. यामुळे कृषी क्षेत्राची वाटचाल हळूहळू व्यापारी पिकांकडे होत आहे.

आर्थिक सुधारणा काळात जागतिक व्यापारात कृषिचा समावेश केल्यामुळे सन् १९९५-९६ पासून व्यापारी पिकांच्या उत्पादनात अधिक वाढ घडून आली असल्याचे दिसून येते. असे असले तरीही राज्याची लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत आहे. त्या प्रमाणात कृषी अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होताना दिसून येत नाही. कृषी अन्नधान्याचे उत्पादन पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहे.

| कालखंड / पीक | क्षेत्र (Area) (१००० हेक्टरमध्ये ) | | | | उत्पादन (१००० मे टनमध्ये ) | | | | उत्पादकता (१ प्रति कि ग्रॅममध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९० | २००० | २०१० | २०१३ | १९९० | २००० | २०१० | २०१३ | १९९० | २००० | २०१० | २०१३ |
| एकूण तृणधान्ये | १११३६ | ९८२४ | ८९८५ | ७७०२ | १०७४० | ८४९७ | १०२१८ | ११४०४ | ९६४ | ८६५ | ११७० | १४८१ |
| एकूण कडधान्ये | ८२५७ | ३५५७ | ३३७५ | ३९५३ | १४४१ | १६३७ | ३०९६ | ३१७० | ४४२ | ४६० | ७०३ | ८०२ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण अन्नधान्ये | १४३९३ | १३३८२ | १२१०९ | ११६५५ | १२१८१ | १०१३३ | १२५९० | १४५७४ | ८४६ | ७५७ | १०४० | १२५० |
| एकूण तेलबिया | २८२६ | २५५९ | ३८८३ | ४१४८ | १८८२ | २०९९ | २८१४ | ४८१२ | ६६६ | ८२० | ७२४ | ११६० |

स्रोत - १) Economic and political weekly, research foundation, Mumbai

२) Economic survey of Maharashtra (२०१४-२०१५)

वरील तक्त्यात महाराष्ट्रातील प्रमुख पिकाचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता दर्शाविली आहे. त्यामध्ये वर्ष १९९० मध्ये एकूण तृणधान्याचे क्षेत्र १११३६ हजार हेक्टर तर एकूण अन्नधान्याचे क्षेत्र १४३९३ इतके होते त्यात घट घडून वर्ष २०१३ मध्ये एकूण तृणधान्ये व एकूण अन्नधान्याचे क्षेत्र अनुक्रमे ७७०२ व ११६५५ इतके घटले तर वर्ष १९९० मध्ये एकूण अन्नधान्याचे उत्पादन १२१८१ मेट्रीक टन तर उत्पादकता ८४६ किलो ग्रॅम होती ती वर्ष २०१३ मध्ये वाढ होऊन अनुक्रमे १४५७४ मेट्रीक टन व १२५० प्रति किलो ग्रॅम इतके झाल्याचे दिसून आले.

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता प्रमुख पिकांचे क्षेत्र घटत चाललेले दिसून येते तर प्रमुख पिकांचे उत्पादन व उत्पादकता यामध्ये वाढ झालेली दिसून आली असे असूनही ही वाढ लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात खूप कमी वाढ होतअसल्याची दिसून येते.

**राज्याच्या कृषी विकासातील समस्या :**

राज्याच्या कृषी विकासात वाढ होत असली तरी त्यामध्ये अस्थिरता असल्याचे दिसून येते कारण कृषी अन्नधान्य उत्पादनात वाढ होत असली तरी अन्नधान्याच्या वृद्धिदरात मोठ्या प्रमाणात चढ-उतार असल्याचे दिसून येते त्याची काही कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१) कृषी ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीसाठी पाहिजे तेंव्हा पाण्याची उपलब्धता होत नाही व पडणाऱ्या पावसाने कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ निर्माण होतो.

२) शेतीमध्ये काम करणारा वर्ग हा अशिक्षित असल्यामुळे त्याला कोणत्या जमिनीत कोणते पीक घ्यावे याची व्यवस्थित माहिती नसते.

३) अयोग्य बी-बियाणाच्या लागवडीमुळे कृषी उत्पादन कमी प्रमाणात होते.

४) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव : आजही शेती ही पारंपारिक पद्धतीनेच केली जाते कारण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर फक्त मोठे शेतकरीच करतात.

५) जमिनीचे तुकडीकरण होत असल्यामुळे शेती वृद्धीदरात अस्थिरता असल्याचे दिसून येते.

६) कर्जबाजारीपणा, शेतीच्या अल्पउत्पादकतेमुळे दरवर्षी काढलेलं कर्ज कमी होण्याऐवजी त्यात भरच पडत जाते.

७) कृषी विकासासाठी व्यूहरचना, धोरणे व योजना राबवल्या जात असतील तरी त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही.

८) कृषीसाठी केल्या जाणाऱ्या तरतुदी या उद्योगक्षेत्रापेक्षा कमी असल्यामुळे कृषी विकासात अडथळे निर्माण होतात.

९) शेतकऱ्याकडे उत्पादीत मालाची योग्य पॅकींग व मालाची साठवणूक करण्याची उपलब्धता नसल्यामुळे त्याला उत्पादीत माल लगेच बाजारात विकावे लागते.

१०) किंमतीतील चढउतारामुळे कृषी मालाला योग्य भाव मिळत नाही.

**कृषी विकासासाठी उपाययोजना :**

राज्याच्या कृषी विकासात भर पडत असली तरी होणारा कृषी विकास हा पाहिजे त्या प्रमाणात होत नाही त्यासाठी पुढील उपाययोजना सूचविण्यात येतात.

१) कृषी विकासासाठी व्यूहरचना आखताना एकेका घटकांचा (पैलूचा) विकास करणारी धोरणे न ठरविता समग्र कृषी विकास कसा साध्य करता येईल या अनुषंगाने व्यूहरचना आखली जावी.

२) कृषिच्या विकासासाठी संस्थात्मक सुधारणांवर भर देण्यात यावा. उद्योगाच्या विकासासाठी सरकार जे धोरण राबवित असते त्याचप्रमाणे कृषी विकासासाठी धोरण राबविणे गरजेचे असून त्याची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे.

३) कृषी किंमत धोरणानुसार किमान आधारभूत किंमती जाहिर करताना लहान व सीमांत शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन त्या जाहिर कराव्यात.

४) राज्याच्या कृषिचे मान्सूनवरील अवलंबित्व अधिक असल्यामुळे कृषीत मोठी अस्थिरता दिसून येते. त्याचा विपरित परिणाम सीमांत व लहान शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. म्हणून कृषीला अधिकाधिक सिंचनाखाली आणण्याचे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

५) शाश्वत कृषी विकासासाठी तंत्रज्ञानात्मक बदलाबरोबरच पर्यावरण संरक्षण व संवर्धन याकडे लक्ष देवून शाश्वत कृषी विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे.

६) कृषी विकासासाठी आखण्यात आलेली व्यूहरचना, धोरणे व योजना ह्या सर्वच शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे अनेक शेतकरी त्या सुविधेपासून वंचित राहतात म्हणून त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

७) हवामानातील बदलाचा कृषीवर विपरीत परिणाम होतो. तो कमी करण्यासाठी हवामानातील बदलाला अनुसरून नवीन पिकांच्या जाती व तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्याना प्रोत्साहन दिले पाहिजेत.

८) लहान व सिमांत शेतकऱ्यापर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

९) लहान व सिमांत शेतकऱ्यापर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

१०) सुधारित बि-बियाणाच्या वापरावर भर देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

११) माती परीक्षण करून कोणत्या मातीत कोणते पीक घ्यावे यासाठी शेतकऱ्याला प्रोत्साहित केले पाहिजे.

**सारांश :**

कृषी विकासात अनेक प्रकारच्या समस्या येत असल्या तरी शासनाने राबविलेल्या व्यूहरचना धोरणे व योजनांची योग्य ती अंमलबजावणी होत नाही, लहान व सिमांत शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या सुविधा पोहोचत नाही. म्हणून शेतीचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर प्रथमतः लहान व सिमांत शेतकऱ्यांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. तरच शेतीचा विकास होण्यास मदत होईल. अन्यथा राज्याच्या शेतीवर अवलंबून असलेल्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्येचा विकासही कुंठीत अवस्थेतच राहील. म्हणून शेती विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

संदर्भ :


१) Sawant S.D., Kulkarni B.N. (१९९९), 'Agricultural Development in Maharashtra Problems and Prspects'

२) Pangariya A. Chakrabaorty P. and Rao M.G. (२०१४), State level Reforms Growth and Development in Indian State, Oxford University Press, New Delhi, p. १२०.

३) Narasaiah, M.L. and Suresh K. (१९९९) Agriculture Production Discovery Publishing House, New Delhi, p. ७४

४) Economic Survey of Maharashtra (२०१४-१५) Government of Maharashtra, Mumbai, p. ९९

५) State of Indian Agriculture (२०११-१२) Ministry of Agriculture Government of India, p. ६

६) Chalal S.S. and Karan Pal (२००३),Dunkel Prosposals and Indian Agriculture Strategic Issues, Deep and Deep Publications, Pvt. Ltd. New Delhi, p. ५६.